माहितीचा
अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये प्राप्त झालेली तक्रार
## तक्रार क्रमांक : २५/२०१९

**तक्रारकर्ता, श्री. गौतम चिरकुटराव कुडवे**

**--विरुध्द--**

**जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,**
**ग्रामपंचायत, बोरगांव (टु.)**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा कृषी अधिकारी (ग्रा. पं.),**
**पंचायत समिती, आष्टी, ता. आष्टी, जि. वर्धा**

**तक्रार अर्जावरील सुनावणी दिनांक : २३.११.२०२२**

**तक्रारकर्ता** : अनुपस्थित
**जन माहिती अधिकारी** : उपस्थित
**प्रथम अपीलीय अधिकारी** : उपस्थित

| द्वितीय अपील आदेशाचा दिनांक | आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा दिनांक | मूळ तक्रार अर्जाचा दिनांक |
|---|---|---|
| २१.०४.२०१८ | -- | ०२.०१.२०१९ |

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) नुसार अपील क्र. १०५४/२०१८, दिनांक २१.०४.२०१८ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता श्री. गौतम कुडवे अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत, बोरगांव (टु.) श्री. विनायक देशमुख उपस्थित असून प्रथम अपीलीय अधिकारी तथा कृषी अधिकारी (ग्रा. पं.), पंचायत समिती, आष्टी, ता. आष्टी, जि. वर्धा दिलीप पी. उखळकर उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगात दाखल केलेल्या (द्वितीय अपील क्र. १०५४/२०१८) मध्ये दिनांक २१.०४.२०१८ रोजी सुनावणी घेवून " जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना प्रत्येक वर्षातील कामाची माहिती देणे अपेक्षित नाही. त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी एका वर्षातील एका कामाची पूर्ण माहिती अपीलार्थीस विनामुल्य उपलब्ध करून द्यावी व अन्य कामाच्या माहितीबाबत स्वतंत्र अर्ज सादर करावा " असे आदेशीत करून प्रस्तुत व्दितीय अपील अर्ज निकाली काढण्यात आले.

सदर द्वितीय अपीलावरील आदेशास अनुसरुन तक्रारकर्ता यांनी दिनांक ०२.०१.२०१९ रोजी कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावरील आज रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणी दरम्यान असे निदर्शनास आले की, अपिलार्थी श्री. कुडवे यांनी दाखल केलेल्या अपिल क्र. १०५४/२०१८ दि. २१.०४.२०१८ रोजीच्या आदेशानुसार, जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना कुठल्याही एका वर्षातील एका कामाची माहिती पूर्ण माहिती अपीलार्थीस विनामुल्य उपलब्ध करून द्यावी व अन्य कामाच्या माहितीबाबत स्वतंत्र अर्ज सादर करण्याबाबत आदेशित केले. त्यानुषंगाने १३ वा वित्त आयोग व १४ वा वित्त आयोग अंतर्गत निधीबाबत वितरणातील माहिती संबधित तक्रार अर्ज दाखल करण्यात आला. श्री. राजेंद्र भोवते, तत्कालिन जनमाहिती अधिकारी यांनी उपरोक्त आदेशाचे अनुपालन केले नाही, असे आढळून येते. आयोगाच्या वतीने दि. ११.११.२०२२ रोजी सुनावणी सूचना निर्गमित करण्यात आले. त्यानुसार तत्कालिन जनमाहिती अधिकारी यांना प्रथम अपिलीय अधिकारी यांनी याबाबत खुलासा सादर करण्याबाबत सूचित करण्यात आले परंतु सदर आदेशाचे अनुपालन झाले नाही. विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी दि. २१.०४.२०१८ रोजी पारित आदेशानुषंगाने अपिलार्थी यांना कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती आयोगाने आदेशित केल्याप्रमाणे एका वर्षातील एका कामाची पूर्ण माहिती अपिलार्थीस सदर आदेश प्राप्त होताच १५ दिवसाच्या आत प्रदान करावी व त्याची पोहच आयोगास सादर करावी.

तसेच अपिलार्थी यांना सदर माहिती प्रदान करण्यास झालेल्या विलंबामुळे तत्कालिन जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ७ (१) चा भंग केला असे प्रथम दर्शनी निदर्शनास येत असल्याने त्यांना कलम १९ (८) (ग) व २० (१) अन्वये शास्ती का करु नये? याचा खुलासा त्यांनी सदर आदेश मिळाल्यापासून १५ दिवसात आयोगास सादर करावा.

आयोगाचे आदेश पारित होवून अपिलार्थी यांना माहितीपासून वंचित रहावे लागले. जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात माहिती प्राप्त करण्याकरीता वारंवार खेटे घालावे लागले त्यामुळे अपीलार्थीस शारिरीक/मानसिक त्रास झालेला आहे, त्यामुळे ते नुकसान भरपाईस पात्र ठरतात संबंधीत प्राधिकरण कृषी अधिकारी (ग्रा. पं.), पंचायत समिती, आष्टी, ता. आष्टी, जि. वर्धा यांनी सदर आदेश मिळाल्यापासून १५ दिवसात कलम १९ (८) (ख) अन्वये ५,०००/- रु. नुकसान भरपाई अपिलार्थीस धनादेशाद्वारे अदा करावी व त्याची पोहच आयोगास सादर करावी, असे आदेशीत करून प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

उपरोक्त आदेशानुसार तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**(राहुल भा. पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण-** नागपूर
**दिनांक-** २०.१०.२०२२

**जावक क्र.**--895-----**दिनांक**-----7 FEB 2023-------

E:\S/A/25-2019 श्री. गौतम कुडवे.docx

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर
सत्यमेव जयते
★ नागपूर ★